# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मौजा जाटतरोडी अंतर्गत न.भु.क्र.४९२ आयसोलेशन हॉस्पीटल
**{प्रकल्प विभाग -१}** जागेमध्ये आरोग्य विभागाकरिता औषधी साठवणूक केंद्र इमारतीच्या बांधकाम करण्यास्तव प्रस्तावित बांधकामाच्या उत्तर-पुर्व कडील भागामध्ये गपीमासे साठविण्यासाठी केंद्र विटा सिमेंट व छत टिनाचे असलेले जुनी इमारत ज्याचे एकूण बांधकाम ४५.९५९ चौ.मिटर असुन, उक्त बांधकाम म.न.पा चे असल्यामुळे तोडण्यासाठी (Demolish) मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.१८.११.२०२५ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. उक्त बांधकाम तोडण्याचा प्रस्तावास मंजुरी मिळण्यास्तव सादर.

**टिप** :-

१. मा.आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका नागपूर यांचे उक्त प्रस्तावीत बांधकामास दि. २९.०४.२०२५ मंजुरी प्राप्त आहे.
२. उक्त बांधकाम तोडण्याकरिता मा.आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका नागपूर यांची दि.१८.११.२०२५ मान्यता प्राप्त आहे.
३. उक्त बांधकामाचे छायाचित्र संलग्न आहे.
४. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 72/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 20/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-१), प्रकल्प विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा जाटतरोडी अंतर्गत न.भु.क्र.४९२ आयसोलेशन हॉस्पीटल जागेमध्ये आरोग्य विभागाकरिता औषधी साठवणूक केंद्र इमारतीच्या बांधकाम करण्यास्तव प्रस्तावित बांधकामाच्या उत्तर-पुर्व कडील भागामध्ये गपीमासे साठविण्यासाठी केंद्र विटा सिमेंट व छत टिनाचे असलेले जुनी इमारत ज्याचे एकूण बांधकाम ४५.९५९ चौ.मिटर असुन, उक्त बांधकाम म.न.पा चे असल्यामुळे तोडण्यासाठी (Demolish) मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.१८.११.२०२५ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. उक्त बांधकाम तोडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.